This is to inform you that in extra ordinary general meeting held on **24thJuly 2015,** Company had passed resolution for consolidation of its share capital by way of increasing the face value per equity share from Rs. 10/- each to face value of Rs. 1,00,000/- each. Upon consolidation, shareholders of the company received such number of equity shares of the Company having face value of Rs. 1,00,000/- each to the extent of their entitlement to equity shares after consolidation. Further, fractions arising from such consolidation were aggregated and number of shares arising were held by fractional entitlement trust, who disposed of said equity shares and proceeds of sale of such shares were distributed proportionately among the shareholders who would otherwise be entitled to fractional entitlements.

However, as on date of this notice, there are few public shareholders/members who have not yet claimed their fractional entitlement amount from the Company and further Company is also not able to contact those shareholders individually as such shareholders had not updated their current address and contact details with the Company and such amount standing unclaimed and unpaid as on date of this notice. Such amount of fractional entitlement has been kept in separate Bank Account of the fractional entitlement trust with HDFC Bank, Ahmedabad.

Pursuant to provisions of Section 125 and all other applicable provisions of the Companies Act, 2013 read with Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016, such amount of fractional entitlement which has not been claimed for seven consecutive years or more shall be transferred by the Company to an "Investor Education and Protection Fund" established by the Central Government within stipulated time.(i.e., on or before **23rd August 2022**).

Hence, shareholders who have not yet claimed their fractional entitlement as mentioned above for equity shares held by them (either physically or in demat mode) are hereby given this public notice and thereby requested to contact undersigned with original proof of holding latest by **23rd July 2022**.

Please further take note that after completion of seven years on **23rd July 2022,** Company will take necessary steps for transfer of such unclaimed amount to an "Investor Education and Protection Fund" established by the Central Government and post such transfer, the Bank Account of the fractional entitlement trust with HDFC Bank, Ahmedabad will be closed and thereafter Company shall not be liable to make any payment of unclaimed fractional entitlement amount to its earlier public shareholders.

For, Bosch Rexroth (India) Private Limited
Sd:-
Karan Bhatt
Company Secretary
FCS 9400
Date: 29th June, 2022

Email: karan.bhatt@boschrexroth.co.in
Website: https://www.boschrexroth.com/en/in/
Phone: (O) +91-2717-8240
(M) +91-90990 12271

दोषींवर कारवाई करा

केडीएमसी टीडीआर घोटाळाप्रकरणी उच्च न्यायालयाचा आदेश

मटा विशेष

ramesh.khokrale@timesgroup.com
Tweet : @rameshkMT

मुंबई : कल्याण तालुक्यातील गावदेवी गावातील राज्य सरकारच्या मालकीची भव्य जमीन काही खासगी व्यक्तींनी तलाठ्यांशी संगनमत करत आपली असल्याचे दाखवून त्या जमिनीवर कल्याण-डोंबिवली महापालिकेकडून टीडीआर मिळवत कोट्यवधी रुपयांची माया जमवल्याचे स्पष्ट झाले आहे. खुद्द राज्य सरकारच्या मुख्य सचिव व ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनीही हा घोटाळा झाल्याचे मुंबई उच्च न्यायालयात मान्य केले आहे. त्यामुळे पालिकेचे संबंधित अधिकारी व लाभार्थी खासगी व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करा, असा आदेश न्यायालयाने नुकताच दिला आहे.

पालिकेतील स्थानिक नेते प्रकाश भोईर यांनी अॅड. संजीव सावंत व अॅड. हेरंब कदम यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल करत हा गंभीर प्रश्न न्यायालयासमोर आणला. मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता व न्या. मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने या प्रकाराची गंभीर दखल घेत उत्तर मागितल्यानंतर राज्य सरकारतर्फे कल्याण उपविभागीय अधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करत घोटाळा झाल्याची कबुली दिली. त्याचबरोबर 'तहसीलदार कार्यालयातून गुन्हा घडला असून, गुरुनाथ सखाराम म्हात्रे व गोरखनाथ सखाराम म्हात्रे या लाभार्थ्यांनी टीडीआर विकून पैसे कमावले, असे प्रथमदर्शनी दिसत आहे. मात्र, सखोल तपासासाठी कालावधी हवा आहे', असे म्हणणे डोंबिवलीतील विष्णूनगर पोलिस ठाण्यातील पोलिस निरीक्षक मोहन खंदारे यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे मांडले.

यापूर्वी पूर्वी दाखल झालेल्या एफआयआर प्रकरणात पोलिसांनी ए-समरी अहवाल दाखल केल्याने तपास बंद झाला. परंतु, महापालिका आयुक्त व अन्य प्रशासनांकडून जमिनीबाबत पूर्वस्थिती आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहितीही न्यायालयाला देण्यात आली. त्यानंतर 'ही याचिका प्रलंबित असली तरी आयुक्तांनी पालिकेतील संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात आणि लाभार्थींविरोधातील कारवाई थांबवू नये. तसेच पोलिसांनीही कायद्याप्रमाणे संबंधितांविरोधात कारवाई करावी', असे खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले. तसेच गुरुनाथ म्हात्रे, वामन म्हात्रे व गोरखनाथ म्हात्रे या प्रतिवादींना दोन आठवड्यांत उत्तर दाखल करण्याचाही आदेश दिला.


उच्च न्यायालय फेरतपासाचा आदेश देऊ शकते का?

'याचिकाकर्त्यांचे आरोप खरे आहेत. महसूल विभागातील दोन अधिकारी या घोटाळ्यातील संशयित आहेत. परंतु, त्यांच्याविरोधात एफआयआर नोंदवल्यानंतर आवश्यक कागदपत्रे न मिळाल्याने पोलिसांनी न्यायदंडाधिकारी न्यायालयात ए-समरी अहवाल दाखल केला. त्यामुळे तपास बंद झाला', अशी माहिती राज्याचे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी न्यायालयाला दिली. तसेच न्यायदंडाधिकाऱ्यांना फेरतपासाचा आदेश देण्याचा अधिकार नसला तरी उच्च न्यायालय देऊ शकते, असे म्हणणे त्यांनी मांडले. मात्र, याबाबत कायदेशीर शंका असल्याने त्याचे निरसन करणारा युक्तिवाद २५ जुलैला मांडावा, अशी सूचना खंडपीठाने महाधिवक्तांना केली.



कसा झाला घोटाळा?

'३.७२ हेक्टर क्षेत्रफळ असलेली सर्वे क्रमांक ३१ (जुना सर्वे क्रमांक ३५०-अ) ही जमीन सात-बारा उताऱ्याप्रमाणे जयराम छाया व अन्य चार यांच्या नावे होती आणि त्याचे कुलमुखत्यारपत्र द्रौपदीबाई सखाराम म्हात्रे यांच्याकडे होते. तर सर्वे क्रमांक ३२ (जुना सर्वे क्रमांक ३६६-अ) ही राज्य सरकारच्या मालकीची ८.३८ हेक्टर गायरान जमीन होती. १९९७ ते २००३ या कालावधीत तलाठ्याच्या मदतीने सर्वे क्रमांक ३२च्या जागी ३१ आणि ३१च्या जागी ३२ लिहिण्याचे फेरफार करण्यात आले. त्यानंतर सर्वे-३२चे बनावट सात-बारा उतारे दाखल करत द्रौपदीबाईंनी जयराम यांच्याकडून जमीन खरेदी केली. त्या सरकारी जमिनीवर स्मशानभूमी, दफनभूमी, खेळाचे मैदान, रस्ते अशी विविध आरक्षणे होती. ती जमीन आपल्या मालकीची व त्यावर आरक्षणे असल्याचे दाखवत म्हात्रेंनी पालिकेकडून टीडीआर मिळवत तो विकला', अशी माहिती उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्रतिज्ञापत्रात दिली.



गायन, भजन आणि संकीर्तन

डॉ. रामचंद्र देखणे

संतांची वाङ्मयीन अभिव्यक्ती दोन प्रकारांतून प्रकट होते. पहिली म्हणजे प्रबंधरचना, तर दुसरी गाथारचना. प्रबंधरचनेमध्ये ज्ञानेश्वरी, भागवत, दासबोध यांसारखे तत्त्वचिंतनात्मक ग्रंथ येतात, तर गाथारचनेमध्ये अभंग, ओवी, भारूड, गौळण, आर्या, साकी, दिंडी, कटाव यांसारख्या रचना येतात आणि त्या कीर्तनात संगीताच्या अंगाने सादर केल्या जातात. कीर्तनरंगच गायनाच्या अंगाने भक्तिरंग होतो. भारतीय साहित्यशास्त्रात 'नवरस' मानले असून, संतांनी 'गायनी' हा दहावा भक्तिरस आपल्या संगीतमय काव्यरचनेतून जन्माला घातला. 'धन्य ते गायनी कळा,' हे समर्थांचे वचन प्रसिद्धच आहे. कीर्तनाचा आणि गायनाचा अनुबंध अनन्यसाधारण आहे. निरूपण हे कीर्तनाचे शरीर आहे, चिंतन हा त्याचा आत्मा आहे, तर संगीत हे त्याचे सौंदर्य आहे. हे गायनाचे आणि संगीताचे सामर्थ्य संतांनी ओळखले आणि भक्ती रसाच्या भावाविष्कारासाठी कीर्तनात संगीताला खूप मोठे स्थान दिले. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात...

गायनाचे रंगी।
भक्ती अद्भुत हे अंगी।
हे तो देणे तुमचे देवा।
घ्यावी अखंडित सेवा।।

शब्दमाधुर्य, स्वरमाधुर्य किंवा नादमाधुर्य यांच्या एकत्रीकरणातून साकारलेले श्रुतीमाधुर्य म्हणजे संगीत होय. म्हणून संगीत ही श्रुती आहे आणि या श्रुतीला लोकश्रुती करण्याचे काम संतांनी कीर्तनाद्वारा केले. भजन ही भक्तिशास्त्राने संगीतविश्वाला दिलेली अनमोल देणगी आहे. भजन हे भगवंताला जोडते. मानवतेला सांधते आणि आत्मानंदाची अनुभूती घडवते. भक्ती संप्रदायाने भजनाला साधनही मानले आहे आणि साध्यही मानले. साधन आणि साध्याचे अद्वैती एकरूपच उभे केले. देव मिळविण्यासाठी भजन करायचे आणि देव पुढे उभा राहिला तरी भजन करायचे. भज हे भगवंताचे नामसंकीर्तन होय. ते संगीताशी जोडले गेले आहे. संतांनी भजनासाठी जरी संगीतातील राग प्रत्यक्षपणे सांगितले नसले तरी भजनाच्या आणि कीर्तनाच्या अंगाने अभंग रचनेतील रामकली, जोगिया, आसावरी, भैरवी, कानडा, पिलू, यमन, धनश्री या रागांची स्वाभाविकपणे अभिव्यक्ती होते. अनुराग म्हणजे प्रेम. संगीतातील राग आणि भक्तीतील अनुराग यांचे एकत्रीकरण म्हणजे भजन होय. देवालाही गायन खूप आवडते.

मत्भक्त यत्र गायन्ति।
तत्र तिष्ठामि नारद।।

असे भगवंत स्वतःच सांगतात, तर स्वतःच्या आनंदासाठी आणि चराचरात चैतन्याचा आनंद फुलविण्यासाठी 'अगायन् देवाः' म्हणजे देवांनीसुद्धा गायन केल्याचे म्हटले आहे. कृतयुगात नारदांनी हे गायन आणि संगीत व्यासांना दिले. तीन वीणेच्या तारांमधून ब्रह्मानंद मिळेल म्हणून ही संगीताची ज्ञानगंगा अखंड वाहत राहिली आणि त्रेतायुगात हे संगीत रावणाला आणि लव-कुशाला दिले. द्वापारयुगात श्रीकृष्णाच्या मुरलीने गोप-गोपिकांच्या भावसंकीर्तनातून ते प्रसृत झाले, तर कलियुगात भक्तिरूप भजनाने ते बहरले आणि आनंदाने गात-नाचत पांडुरंगाचे संकीर्तन उभे राहिले.

(क्रमशः)

'चार ते पाच दिवसांत राज्यात येऊ'

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

दीपक केसरकर यांची माहिती

'आम्ही वेगळी भूमिका घेतल्यानंतर अनेक कायदेशीर बाबी समोर आल्या आहेत. त्यातील काही सुटल्या आहेत तर काही बाकी आहेत. आमचे पुढील रणनीतीवर काम सुरू असून येत्या चार ते पाच दिवसांत आम्ही महाराष्ट्रात परत येऊ शकतो', असे सांगत बंडखोर एकनाथ शिंदे गटातील आमदार दीपक केसरकर यांनी मंगळवारी राज्यात परतण्याचे संकेत दिले.

राज्यातील सत्तासंघर्षावर अजूनही योग्य तोडगा निघालेला नसून सत्तांतर होणार की नाही, झाले तर ते कधी होणार याविषयी उलट सुलट चर्चा सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांशी बोलताना केसरकर यांनी हे संकेत दिले. यावेळी त्यांनी शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांच्यावरही टीका केली. 'राऊत यांच्या भाषेमुळे शिवसेना आणि भाजपमध्ये अधिक दरी निर्माण झाली. पुढील रणनीतीवर आम्ही काम करीत आहोत. रणनीती ही उघड करायची नसते. सध्या मानसिक द्वंद्व सुरू असून शिवसैनिकांमध्ये गैरसमज पसवण्याचे काम सुरू आहे. आम्ही त्यांना समजावण्यात नक्की यशस्वी ठरू', असे केसरकर म्हणाले. आम्ही ४ ते ५ दिवसांत महाराष्ट्रात परत येऊ, असेही ते म्हणाले.

'भाजपसोबत युती करण्याबाबत आमची अजूनही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना विनंती आहे. राष्ट्रवादी आणि काँग्रेस आपले कायमस्वरूपी मित्र असू शकत नाहीत. त्यांचा आमच्या विचारधारेशी संबंध नाही. समान विचारांच्या लोकांशी मैत्री जास्त काळ टिकते. भाजप आणि आमच्यात निश्चितच काही विषयांवर मतभेद असतील, परंतु हे सुधारता येतील. मी उद्धव ठाकरे यांना शेवटचे आवाहन करतो, आमचे मातोश्रीवर प्रेम आहे. त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या आघाडीतून बाहेर पडावे. आपण निवडणुकीला सामोरे गेलो तेव्हा युती म्हणून लोकांकडे मते मागितली. आम्ही बाळासाहेबांचे शिवसैनिक आहोत आणि राहणार', असे ते म्हणाले.

मग जामिनाच्या अटींना अर्थ काय?


म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

राणा दाम्पत्याची न्यायालयाकडून खरडपट्टी

'न्यायालयाने तुम्हाला (आरोपी राणा दाम्पत्य) जामीन देताना काही अटी घातल्या असतील तर त्यांचे पालन करणे तुमचे कर्तव्य आहे. अटींचे पालन केले जाणार नसेल तर त्या अटींना अर्थ काय उरतो. हनुमान चालीसा म्हणणे हा गुन्हा असेल तर मी १४ वर्षे तुरुंगात राहण्यास तयार आहे, अशी वक्तव्ये या प्रकरणाशी संबंधित नाहीत, असे तुम्ही कसे काय म्हणता?', अशा शब्दांत विशेष न्यायालयाने अपक्ष खासदार नवनीत राणा व त्यांचे पती अपक्ष आमदार रवी राणा यांची खरडपट्टी काढली.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' या खासगी निवासस्थानाबाहेर हनुमान चालीसा म्हणण्याची घोषणा केल्यानंतर कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्याच्या कारणाखाली पोलिसांनी राणा दाम्पत्याविरोधात गुन्हा नोंदवून २३ एप्रिलला अटक केली होती. त्यानंतर आमदार-खासदारांविरुद्धच्या प्रकरणांची सुनावणी घेणाऱ्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश राहुल रोकडे यांनी त्यांना ४ मे रोजी अनेक अटी घालून जामीन मंजूर केला होता. त्या अटींमध्ये या प्रकरणाशी संबंधित काहीही प्रसारमाध्यमांकडे बोलायचे नाही, अशीही एक अट होती. त्या अटीचा दाम्पत्याने भंग केला असल्याने जामीन आपोआप रद्द झाला असल्याने त्यांच्याविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट जारी करून त्यांना ताब्यात घेण्याचा आदेश द्यावा, अशी विनंती पोलिसांनी विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांच्यामार्फत अर्जाद्वारे केली आहे.





'आम्ही पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्याशी संबंधित कोणतेही वक्तव्य केले नसल्याने अटीचा भंग केला नाही', असा दावा राणा दाम्पत्याने प्रतिज्ञापत्राद्वारे केला. तसेच 'हनुमान चालीसा म्हणणे हा आरोपींचा मूलभूत हक्क आहे. त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाही हक्क आहे. तसेच पुन्हा मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर जाऊन तसे करू, असे वक्तव्य आरोपींनी केलेले नाही. त्यामुळे अटीचा भंग ठरत नाही', असा युक्तिवाद त्यांनी सोमवारच्या सुनावणीत अॅड. रिझवान मर्चंट यांच्यामार्फत केला. तर, 'हनुमान चालीसा म्हणणे हा गुन्हा असेल तर मी १४ वर्षे तुरुंगात राहण्यास तयार आहे. मला गजाआड टाकल्याबद्दल देशभरातील रामभक्त व हनुमानभक्त तुम्हाला धडा शिकवतील. राम व हनुमान यांना विरोध करणाऱ्या व्यक्तींचे काय होते हे तुम्हाला नागरिक दाखवतील, अशी वक्तव्ये आरोपींनी त्यांना काहीही बोलण्यास मनाई असताना केली. त्यामुळे त्यांना न्यायालयाच्या आदेशाचीही पर्वा नाही, असाच अर्थ होतो', असा युक्तिवाद घरत यांनी केला. तेव्हा, 'अशी वक्तव्ये ही या प्रकरणाशी संबंधित नाहीत, असे आरोपी कसे म्हणू शकतात? अटींचे पालन होणार नसेल तर त्या अटींना काय अर्थ उरतो?' असे प्रश्न न्यायाधीशांनी उपस्थित केले. अखेरीस अशा प्रकरणांबाबतचे सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर करण्यास घरत यांना सांगून न्यायालयाने पुढील सुनावणी २० जुलैला ठेवली.

अकरावीसाठी ३,६५,९१५ जागा

मुंबई : मुंबई महानगरक्षेत्रामध्ये अकरावी प्रवेशासाठी तब्बल तीन लाख ६५ हजार ९१५ जागा उपलब्ध झाल्या आहेत. यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेमध्ये सध्या कॉलेजांची नोंदणी सुरू होती. यंदा या प्रक्रियेत भिवंडी, वसई व पनवेल या भागांतील ज्युनिअर कॉलेजांचाही समावेश करण्यात आला आहे. या प्रक्रियेसाठी १०१० कॉलेजांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ९८५ कॉलेजांनी पूर्ण माहिती भरली आहे. त्यानुसार यंदा कला शाखेसाठी ४८ हजार १७०, वाणिज्य एक लाख ९६ हजार ३४०, तर विज्ञान शाखेसाठी एक लाख १६ हजार ४०० जागा असणार आहेत. तसचे एचएसव्हीसीसाठी पाच हजार पाच जागा उपलब्ध असल्याचे शिक्षण उपसंचालक कार्यालयाने म्हटले आहे.

मोटारमन दरवाजे उघडण्यास विसरतो तेव्हा...

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

सीएसएमटीत वातानुकूलित लोकलमधील प्रसंग

मुंबई लोकलमधील प्रवासी आपल्या बॅगा, जेवणाचे डबे गाडीतच विसरतात. अनेकदा ते मोबाइलही विसरल्याची नोंद आहे. विसरभोळ्या मुंबईकरांमध्ये आता चक्क वातानुकूलित लोकलच्या मोटारमनचीसुद्धा भर पडली आहे. गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर लागल्यानंतर हे महाशय दरवाजे उघडायचेच विसरून गेले.

शनिवार-रविवार सुट्टीचा आनंद घेतल्यानंतर सोमवारी ठरल्याप्रमाणे नोकरदार वर्ग कामावर निघाला. सामान्य लोकलमधील प्रचंड गर्दीतून घामाघूम होत कार्यालय गाठण्यापेक्षा वातानुकूलित लोकलने प्रवास करण्यास प्रवाशांची प्राथमिकता आहे. सोमवारी सकाळी ९.०३ला ठाण्याहून वातानुकूलित लोकल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेने रवाना झाली. लोकलने मशिद स्थानक सोडताच अनेक प्रवासी दरवाजाजवळ जाऊन उभे राहिले. लोकलचे दरवाजे उघडताच पटापट कार्यालय गाठायचे, असा त्यांचा नित्यक्रम.

लोकल सीएसएमटी स्थानकात दाखल झाली. त्यानंतर मोटारमन सवयीप्रमाणे उतरून मोटारमन-गार्ड लॉबीच्या दिशेने पावले टाकू लागला. मात्र लोकल फलाटावर लागूनही फलाटावरील प्रवासी बाहेरच उभे असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याचक्षणी तो तातडीने वळला. लगेच मोटारमन केबिन गाठले आणि लोकलचे दरवाजे उघडले. लोकल फलाटावर लागूनही दरवाजे उघडले नसल्याने अस्वस्थ झालेले प्रवासी मग तातडीने बाहेर पडले व फलाटावरील प्रवासी गाडीत शिरले, असे प्रवासी चंद्रकांत शिंदे यांनी सांगितले.

सामान्य लोकलची सवय असल्याने वातानुकूलित लोकलमधील मोटारमन दरवाजे उघडण्यास विसरल्याची चर्चा दुसऱ्या दिवशीही या लोकलमधील नियमित प्रवाशांमध्ये रंगली होती. दरम्यान, याबाबत विचारणा केली असता, 'याबाबत कोणत्याही प्रवाशांनी लेखी तक्रार दिलेली नाही किंवा असा प्रकार घडलेला नाही', असे मध्य रेल्वेच्या जनसंपर्क विभागाकडून सांगण्यात आले.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५
MERC दूरध्वनी २२१६ ३९६४/२२१६ ३९६५ फॅक्स: ०२२-२२१६३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in वेबसाईट www.merc.gov.in

जाहिरात क्र. १३/२०२२-२३

पाहिजेत

अध्यक्ष, सीजीआरएफ आणि स्वतंत्र सदस्य (सीपीओ), सीजीआरएफ

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग), राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी/परिमंडळामध्ये अध्यक्ष, आणि स्वतंत्र सदस्य (सीपीओ), ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच यांच्या नियुक्त्यांसाठी कंत्राटी तत्त्वावर किमान तीन वर्षांच्या कालावधीसाठी एकूण १६ पदांकरिता (१३ - अध्यक्ष आणि ०३ स्वतंत्र सदस्य (सीपीओ)) संपूर्ण तपशीलासह अर्ज मागवित आहे. पात्रता निकष आणि कार्यकक्षेकरिता आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत स्थळावर कृपया संपर्क साधावा.

आयोगाच्या संकेत स्थळावर अपलोड करण्यात आलेला विहित नमुन्यतील अर्ज सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्र. १, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४००००५ येथे पोस्टाने किंवा कुरियरने, **दि. १९/०७/२०२२ रोजी सांय. ५.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी पाठवावेत.

दिनांक :२९/०६/२०२२
ठिकाण : मुंबई

सही/-
(अभिजीत देशपांडे)
सचिव, मविनिआ

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MUHS
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२ ००४.
दुरध्वनी क्र. (०२५३) २५३९१५६, २५३९१९७

विद्यापीठातर्फे शै. वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यात येणाऱ्या सर्टीफिकेट कोर्स इन जेनेटीक डायग्नॉस्टीक्स अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेबाबतची सूचना

विद्यापीठातर्फे शै. वर्ष २०२१-२२ मध्ये सुरु होणाऱ्या **सर्टीफिकेट कोर्स इन जेनेटीक डायग्नॉस्टीक्स** अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. हा अभ्यासक्रम विभागीय कार्यालय, पुणे येथे राबविण्यात येणार असून सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशास आवश्यक अर्हता, अभ्यासक्रम कालावधी, स्वरुप व अर्ज इत्यादीची सविस्तर माहिती व ऑनलाईन लिंक विद्यापीठाच्या **www.muhs.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवेशाकरीता ऑनलाईन प्रवेश अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत दि. **०५/०७/२०२२** रात्री १२:०० वा. पर्यंत आहे.

दि. २९/०६/२०२२ **कुलसचिव**

डुकरे, रेड्यांची उपमा देऊन समेट कसा?


म. टा. विशेष प्रतिनिधी

एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरे यांना सवाल

'एकीकडे बाळासाहेबांच्या शिवसैनिकांना डुकरे आणि रेडे यांची उपमा द्यायची आणि दुसरीकडे राज्यातील हिंदूविरोधी सरकार वाचविण्यासाठी याच आमदारांना समेटाची हाक द्यायची, याचा अर्थ काय', असा रोखठोक सवाल शिवसेनेचे बंडखोर एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना केला आहे.

ठाकरे यांनी मंगळवारी पुन्हा एकदा बंडखोर आमदारांना मुंबई आणि महाराष्ट्रात परतण्याचे आवाहन केले. जे असेल ते समोरासमोर बसून बोला, असे आवाहनही त्यांनी केले आहे. नेमक्या याच आवाहनाचा धागा पकडत शिंदे यांनी ट्वीट केले आहे. 'एका बाजूला पुत्राने व प्रवक्त्याने वंदनीय बाळासाहेबांच्या शिवसैनिकांना डुकरे, नाल्याची घाण, रेडा, कुत्रे, जाहील व मृतदेह म्हणायचे, त्यांचा बाप काढायचा तर दुसऱ्या बाजूला मात्र हिंदुविरोधी महाराष्ट्र विकास आघाडीचे सरकार वाचवण्यासाठी याच आमदारांना समेटाची हाक द्यायची, याचा अर्थ काय', असा सवाल शिंदे यांनी केला आहे.

तत्पूर्वी गुवाहाटीमध्ये गेल्या सात दिवसांपासून मुक्कामी असलेल्या शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीनंतर पहिल्यांदाच मंगळवारी हॉटेलच्या गेटवर येऊन प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. आमचे कोणतेही आमदार कुणाच्या संपर्कात नाहीत, जे कुणी संपर्कात असतील, त्यांची नावे सांगा, असे थेट आव्हानच शिंदे यांनी यावेळी दिले. शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदारांना सोबत घेत बंड पुकारले असून त्यांच्या या बंडाचा सातवा दिवस आहे. मंगळवारी दुपारी शिंदे हे फोनवर बोलत हॉटेलच्या गेटवर आले होते. यावेळी प्रसारमाध्यमांसोबत बोलत असताना शिंदे यांनी शिवसेनेला आव्हान दिले. गुवाहाटीमध्ये सर्व आमदार हे स्वतःच्या इच्छेने आले आहे. कुणावरही जबरदस्ती केलेली नाही. आमच्याकडे ५० आमदार आहेत. आमचे कोणतेही आमदार कुणाच्या संपर्कात नाहीत, असे ते म्हणाले.




कंगनाची ४ जुलैला न्यायालयात हजेरी

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

अख्तर यांच्या अर्जावरही त्याच दिवशी सुनावणी

बॉलीवूडमधील ज्येष्ठ गीतकार जावेद अख्तर यांची कथित मानहानी केल्याच्या खटल्याच्या सुनावणीसाठी अभिनेत्री कंगना रणोट ४ जुलैला अंधेरी न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर राहणार आहे. तिच्या वकिलांनी याबाबत न्यायालयात लेखी हमी दिली.

कंगना ही खटल्याच्या सुनावणीला सातत्याने अनुपस्थित राहत असल्याबद्दल अख्तर यांनी तीव्र आक्षेप घेत तिच्याविरोधात वॉरंट जारी करण्याची विनंती अर्जाद्वारे केली आहे. सोमवारी झालेल्या सुनावणीतही कंगना अनुपस्थित राहिल्याने तिच्या वकिलांनी या अनुपस्थितीबाबत मुभा देण्याची विनंती केली. तेव्हा, पुढील सुनावणीला (४ जुलै) आरोपी हजर राहील, अशी हमी देण्याचे निर्देश वकिलांना दिले. त्याप्रमाणे वकिलांनी हमी दिल्यानंतर न्यायालयाने सोमवारच्या अनुपस्थितीबाबत मुभा दिली.



कंगनाने रिपब्लिक वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत आपली नाहक बदनामी करणारी विधाने केली, असे म्हणत अख्तर यांनी तिच्याविरोधात मानहानीचा खटला भरला आहे.

हेलिकॉप्टर अपघातात चौघांचा मृत्यू

(पान एकवरून) कळविण्यात आले. नौदलाने सीकिंग व अॅडव्हान्स्ड लाइट हेलिकॉप्टर मदतीसाठी धाडले. त्याचवेळी 'आयएनएस तेग' ही युद्धनौकाही परिसरात होती. तिलादेखील मदतकार्यासाठी घटनास्थळी वळविण्यात आले. ओएनजीसीच्या 'ओएसव्ही मालविया', 'ओएसव्ही ग्रेटशिप अस्मी', 'ओएसव्ही एबीएस अनोखी' व 'ओएसव्ही सुभप्रदा' या नौकादेखील विविध इंधन विहिरवरुन घटनास्थळाकडे वळविण्यात आल्या. या सर्वांच्या प्रयत्नातून हेलिकॉप्टरमधील सर्व नऊ जणांना वाचविण्यात आले. मात्र त्यापैकी चौघांचा मृत्यू झाला. त्यामध्ये तीन ओएनजीसीच्या तर एका कंत्राटी कर्मचाऱ्याचा समावेश होता. या चौघांना नौदलाच्या हेलिकॉप्टरने ओएनजीसीच्या जुहू येथील रुग्णालयात आणले जात असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. .

ओएनजीसीच्फा माहितीनुसार, या हेलिकॉप्टरमध्ये दोन वैमानिक, एक कंत्राटी कर्मचारी व ओएनजीसीचे सहा कर्मचारी होते. वैमानिकांनी हेलिकॉप्टर काही काळ पाण्यावर तरंगविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नऊ जणांना पाण्यातून बाहेर काढणे शक्य झाले.



SC
शारदा क्रॉपकेम लिमिटेड
CIN: L51909MH2004PLC145007
नोंदणीकृत कार्यालय: प्राईम बिझनेस पार्क, दशरथलाल जोशी मार्ग, विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ४०००५६; **दुरध्वनी क्र.:** ०२२ ६६७८ २८००; **इमेल:** co.sec@shardaintl.com
वेबसाईट: www.shardacropchem.com

कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा व अभिलेख (रेकॉर्ड) तारखेची सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की मेसर्स शारदा क्रॉपकेम लिमिटेडच्या ('कंपनी') सभासदांची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम'/'सभा') मंगळवार दिनांक २ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता (भाप्रवे) व्हिडीओ कॉन्फरंसिंग('व्हिसी')/अन्य दृक श्राव्य माध्यमातून ('ओएव्हीएम'), एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजासाठी आयोजित करण्यात आली आहे.

कोविड-१९ साथरोगाचा वाढता उद्रेक लक्षात घेऊन, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने ('एमसीए') आपल्या ५ मे, २०२० दिनांकित परिपत्रक सहवाचिता ८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, १३ जानेवारी, २०२१, ८ डिसेंबर २०२१, १४ डिसेंबर २०२१ आणि ५ मे २०२२ दिनांकित परिपत्रकांन्वये (यापुढे सामुदायिकरित्या 'एमसीए परिपत्रके' म्हणून संबोधण्यात येतील) आणि भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सेबी) यांनी आपल्या १२ मे, २०२०, १५ जानेवारी, २०२१ आणि १३ मे २०२२ दिनांकित परिपत्रकांन्वये (यापुढे सामुदायिकरित्या 'सेबी परिपत्रके' म्हणून संबोधण्यात येतील) सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हिसी / ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएम आयोजित करण्याची अनुमती दिली आहे. कंपनी कायदा, २०१३ ('कायदा'), सेबी (सूचीबद्धता बंधने व प्रगटन आवश्यकता) अधिनियम, २०१५ ('सेबी सूचीबद्धता बंधने'), एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रके यांच्या अनुपालनार्थ कंपनीच्या सभासदांची एजीएम व्हिसी / ओएव्हीएमच्या माध्यमातून आयोजित करण्यात येईल.

एजीएम सूचना तसेच आर्थिक वर्ष २०२१-२२ चे वार्षिक अहवाल केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सभासदांना पाठविण्यात येईल ज्यांचे इमेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरीजकडे नोंदविलेले आहेत. सदर सूचना व वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट www.shardacropchem.com येथे आणि अनुक्रमे बीएसई लिमिटेड www.bseindia.com आणि नॅशनल एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com या स्टॉक एक्स्चेंज वेबसाईटवर उपलब्ध असतील. एजीएममध्ये सहभागी होण्यासंबंधीच्या सूचना एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात येतील. व्हिसी /ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएममध्ये उपस्थित राहणाऱ्या सभासदांची गणना कंपनी कायदा, २०१३ कलम १०३ अंतर्गत आवश्यक गणसंख्येमध्ये केली जाईल.

एजीएम सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यासाठी कंपनी आपल्या सर्व सभासदांना दूरस्थ ई-मतदान सुविधा (दूरस्थ ई-मतदान) व एजीएम दरम्यान मतदानासाठी ई-मतदान यंत्रणा (ई-मतदान) उपलब्ध करून देत आहे. दूरस्थ ई-मतदान / ई-मतदान यासंबंधीची तपशीलवार प्रक्रिया व ई-मतदानासाठी लॉगीन तपशील एजीएम सूचनेमध्ये नमूद करण्यात येईल.

भौतिक स्वरुपात भागधारणा करणाऱ्या सभासदांनी किंवा ज्यांनी अद्याप आपले इमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीजकडे नोंदविलेले नाहीत अशा सभासदांनी कृपया कंपनीकडे किंवा आरटीए कडे अनुक्रमे co.sec@shardaintl.com किंवा emeetings@kfintech.com या इमेल पत्त्यांवर इमेल पाठवून ते नोंदवावेत. सभासद https://ris.kfintech.com/clientservices/mobilereg/mobileemailreg.aspx यद्वारे देखील आपला इमेल पत्ता व मोबाईल क्रमांक थेट नोंदवू शकतात.

लाभांश आणि ते प्रदान करण्यासाठी अभिलेख तारीख

कंपनीने ३१ मार्च, २०२२ रोजी समाप्त झालेल्या आर्थिक वर्षाच्या अंतिम लाभांशासाठी पात्र सभासदांची निश्चिती करण्यासाठी **मंगळवार, दिनांक २६ जुलै, २०२२** ही तारीख **'अभिलेख तारीख'** म्हणून निश्चित केली आहे.

एजीएम समाप्तीपासून ३० दिवसांच्या आत अंतिम लाभांश अशा सभासदांना प्रदान करण्यात येईल ज्यांची नावे अभिलेख तारखेच्या दिवशी कंपनीच्या सभासद नोंदवही मध्ये नोंदविलेली असतील.

ज्या सभासदांनी आपल्या बँक खात्याचे तपशील कंपनीकडे नोंदविलेले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक मार्गाने अंतिम लाभांश प्रदान करण्यात येईल. ज्या सभासदांनी आपल्या बँक खात्याचे तपशील कंपनीकडे नोंदविलेले नाहीत त्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर लाभांश अधिपत्रे पाठविण्यात येतील.

सदर सूचना कंपनीच्या सर्व सभासदांच्या माहितीसाठी आणि हितासाठी जारी करण्यात आली आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ: मुंबई
दिनांक: २८ जून २०२२

स्वाक्षरी/-
जेटकिन गुढका
कंपनी सचिव